**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप दिगंबर नवगिरे
१३, एलआयजी, निगडी, पुणे-४४ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपायुक्त,
परिमंडळ क्र.३. पुणे शहर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
निगडी पोलीस ठाणे, निगडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०५ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.६.२००८ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.दिलीप दिगंबर नवगिरे
१३, एलआयजी, निगडी, पुणे-४४

**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
निगडी पोलीस ठाणे, निगडी, पुणे प्रतिनिधी -श्री.एस.एन.घाडगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.४.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>निगडी पोलीस स्टेशन येथे श्री.अगस्ती कानिटकर प्रमोटर व बिल्डर यांच्यावर दाखल झालेला गुन्हा क्र.सीआर-१९८/०५ व जेएमएफसी कोर्टात दाखल झालेला फौजदारी गुन्हा क्र.८९/०६, दि.२३.२.२००६ याची माहिती. तसेच आरोपीविरुध्द भा.दं.वि.क.४२०,४६८,४७१ प्रमाणे गुन्हा सिध्द करण्यासाठी काय उपाययोजना आहे व त्याकामी सर्व आवश्यक त्या बाबींची पूर्तता केली आहे काय? |

## विवेचन

निगडी पोलीस स्टेशनमधील गुन्हा रजि.नं.१९८/२००५ या गुन्ह्याच्या तपाससंदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री. दिलीप दिगंबर नवगिरे यांनी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निगडी पोलीस स्टेशन, पुणे यांच्याकडे मागितली होती. आपल्याला अपुरी व संदिग्ध माहिती मिळाली, या कारणावरुन श्री.नवगिरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र.३, पुणे शहर यांच्याकडे अपील केले. माहिती म्हणून त्यांनी विचारणा केलेले मुद्दे कार्यवाहीशी निगडीत असून 'माहिती' या सदरात येत नाहीत, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी श्री.चंद्रशेखर दैठणकर यांनी दोन वेळा सुनावणी घेतल्यानंतर दिला. त्याविरुध्द श्री.नवगिरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. भारतीय दंडविधान कलम ४२०, ४६८ व ४७१ अंतर्गत येणाऱ्या गुन्ह्याबाबत तपासातील आवश्यक बाबींची पूर्तता केलेली नाही, इ. विविध मुद्दे त्यांनी अपिलात नमूद केले आहेत.

**राज्य माहिती आयोगाने दिनांक २४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील** निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. यामध्ये तीनही घटकात एकमत न झाल्यामुळे त्याचवेळी सुनावणी घेण्यात आली.

आपण पाच मुख्य मुद्दयांची माहिती मागितली होती. संबंधित गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी चुकीच्या पध्दतीने कारवाई केली आहे. हस्ताक्षरतज्ज्ञाचे मत घेतलेले नाही, काही कागदपत्रे संकलित केलेली नाहीत, अशा स्वरुपाच्या त्रुटी तपासात आहेत. त्याचे स्पष्टीकरण

मिळाले नाही, असे प्रतिपादन श्री.नवगिरे यांनी केले. श्री.नवगिरे यांच्या सर्व मुद्दयांची उततरे देण्यात आली आहेत. शक्य तेथे स्पष्टीकरणही देण्यात आले आहे, परंतु तपासात त्रुटी असल्याची त्यांची तक्रार व त्या अनुषंगाने कार्यवाहीची मागणी ही 'माहिती' ठरत नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून त्यांना वारंवार स्पष्ट करण्यात आले आहे, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निगडी पोलीस स्टेशन श्री.एस.एन.घाडगे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

आपला मूळ अर्ज दि.३.१०.२००६ चा असून उत्तर विलंबाने म्हणजे दि.२८.११.२००७ रोजी दिलेले आहे, असा मुद्दा श्री.नवगिरे यांनी मांडला. मात्र तारखांबाबतचा नेमका तपशील जन माहिती अधिकारी सांगू शकले नाहीत. श्री.नवगिरे यांनी पोलीस मुख्यालयाकडे अर्ज दिला होता, तसेच त्यावेळच्या अनेक अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत, असे जन माहिती अधिकारी श्री.एस.एन.घाडगे यांनी सांगितले. या विलंबाबाबत दहा दिवसात तारखांचा तपशिलवार अहवाल सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार श्री.घाडगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निगडी पोलीस स्टेशन यांनी दि.२७.६.२००८ रोजी आयोगाला अहवाल सादर केला. दि.३.१०.२००७ रोजी श्री.नवगिरे यांनी पोलीस आयुक्त मुख्यालयात टपालाने पाठविलेला अर्ज मुख्यालयाकडून माहितीसाठी सहाय्यक माहिती अधिकारी, शिवाजीनगर, पुणे यांच्या कार्यालयाकडे व तेथून निगडी पोलीस स्टेशन बारनिशी कर्मचारी यांच्याकडे पाठविण्यात आला. दि.१२.१०.२००६ रोजी हा अर्ज निगडी पोलीस स्टेशन बारनिशी कर्मचाऱ्याकडे प्राप्त झाला. अर्ज इंग्रजीत असल्यामुळे मागितलेल्या माहितीबाबतचा स्पष्ट बोध होत नसल्याने दप्तरी कर्मचाऱ्याने श्री.नवगिरे यांच्याकडे जाऊन त्यांना पाहिजे असलेल्या माहितीची मागणी मराठीत अनुवादित करुन घेतली व दि.२८.११.२००६ रोजी माहिती पुरविली, असे श्री.घाडगे यांनी या अहवालात नमूद केले आहे.

अपीलकर्त्याला माहितीबाबतचे स्पष्टीकरण देऊन कार्यवाहीच्या अनुषंगाने मार्गदर्शनही केले. तसेच यापूर्वीच आरोपीविरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आल्याचे सांगितले होते, असे

तत्कालीन अपिलीय प्राधिकारी व पोलीस उपायुक्त परिमंडळ-३, पुणे शहर श्री.चंद्रशेखर दैठणकर यांनी आयोगाला दि.१४.१२.२००७ रोजी सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. तसेच पोलीस स्टेशनकडील कामकाज, त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्याची संख्या, माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे माहिती देण्यासाठी कोणतेही संख्याबळ उपलब्ध नसणे, हद्दीतील कायदा व सुव्यवस्था या बाबी लक्षात घेता सहाय्यक माहिती अधिकारी यांना दंड करणे उचित होणार नाही. यास्तव त्यांना याबाबत सक्त सूचना देण्यात येत आहे, असे श्री.दैठणकर यांनी श्री.नवगिरे यांना दि.२.४.२००७ रोजी पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

वरील बाबी लक्षात घेता श्री.नवगिरे यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर त्याबाबतची कल्पना त्यांना वेळोवेळी देण्यात आली आहे. मात्र विलंबाची तांत्रिक कारणे न सांगता हीच प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करणे शक्य व आवश्यक आहे, याची जाणीव तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अर्जुन सकुंडे व अपिलीय प्राधिकारी श्री.चंद्रशेखर दैठणकर यांना देण्यात येत आहे.

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३.७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रभाकर बळवंत खडकभावी
बिल्डिंग नं.०५, फ्लॅट नंबर ०३,
अर्चनानगर को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.,
सिटी सर्व्हे नं.९४३, सर्व्हे नं.३९/२/२,
एरंडवणे,गणेशनगर कॉर्नर जवळ, पुणे-३८ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, — उत्तरवादी
क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहसंचालक,
क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.६.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. प्रभाकर बळवंत खडकभावी
बिल्डिंग नं.०५, फ्लॅट नंबर ०३,
अर्चनानगर को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.,
सिटी सर्व्हे नं.९४३, सर्व्हे नं.३९/२/२,
एरंडवणे, गणेशनगर कॉर्नर जवळ, पुणे-३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे तर्फे प्रतिनिधी
श्री. जे. पी. आधाने, सहाय्यक जन माहिती अधिकारी

**जन माहिती अधिकारी** तथा सहसंचालक,
क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे तर्फे प्रतिनिधी
श्री. जे. पी. आधाने, सहाय्यक जन माहिती अधिकारी

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

स्वत:च्या गोपनीय अहवालाची प्रत, तसेच राष्ट्रीय छात्रसेना कार्यालयातील पुणे विभागातील कर्मचाऱ्यांना सन १९९१ ते २००६ या काळात आगाऊ वेतनवाढी न देऊन केलेल्या अन्यायाबाबत

विवेचन

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या संचालकांनी राष्ट्रीय छात्रसेना कार्यालयाच्या पुणे / कोल्हापूर विभागातील कर्मचाऱ्यांना सन १९९१ ते २००६ या काळात आगाऊ वेतनवाढी का दिल्या नाहीत, तसेच आपल्या गोपनीय अहवालाची प्रत द्यावी, आदि मागण्या अपीलकर्ता श्री. प्रभाकर बळवंत खडकभावी यांनी जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी शुल्क कळविले व शुल्क भरल्यानंतर माहिती पाठविली. त्याविरुध्द श्री. खडकभावी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यानंतर श्री. खडकभावी यांना गोपनीय अहवालाचे प्रमाणपत्र देण्यात आले. परंतु आपल्यावरील व अन्य कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर करावा, अशा मागणीसाठी श्री. खडकभावी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. २७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यात माहितीबाबत उभय बाजूंचे एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने पुणे / कोल्हापूर विभागातील राष्ट्रीय छात्रसेना कर्मचाऱ्यांना (केवळ दोन कर्मचाऱ्यांचा अपवाद वगळता ) आगाऊ वेतनवाढी दिल्या नाहीत, याउलट अन्य विभागातील कर्मचाऱ्यांना मात्र अशा वेतनवाढी दिल्या. पात्र कर्मचाऱ्यांवर हा अन्याय आहे, त्यामुळे याबाबतची माहिती आपल्याला मिळावी अशी मागणी श्री. खडकभावी यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केली आहे. ती त्यांनी सुनावणीत लेखी व तोंडी विस्ताराने मांडली. श्री. खडकभावी यांना माहिती देण्याबाबत विलंब झालेला नाही. अर्जातील एकाच मुद्दयाबाबत त्यांनी कागदपत्रांची मागणी केली होती. त्यांचे अन्य मुद्दे खुलासा विचारणारे व तक्रार नोंदविणारे आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. जे.पी.आधाने यांनी केले.

आपल्याला आपल्या गोपनीय अहवालाची प्रत 'गोपनीय' म्हणून नाकारण्यात आली आहे, ती मिळावी, अशी मागणी श्री. खडकभावी यांनी केली.

श्री.खडकभावी यांची मागणी आगाऊ वेतनवाढीसंबंधातील तक्रारीच्या स्वरूपाची व प्रशासकीय कार्यवाहीची आहे. अशा प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र त्यांच्या स्वतःच्या गोपनीय अहवालाची प्रत, आगाऊ वेतनवाढ दिलेल्या कर्मचाऱ्यांची यादी, आगाऊ वेतनवाढीसाठी अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांची यादी ही माहिती श्री. खडकभावी यांना निःशुल्क द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार गोपनीय अहवालाच्या प्रती श्री. खडकभावी यांना पाठविल्याचे व अन्य माहिती दिल्याचे सहाय्यक जन माहिती अधिकारी तथ सहाय्यक संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय श्री. सुहास एम. पाटील यांनी दि. २९.७.२००७ च्या पत्रान्वये आयोगाला अवगत केले. परंतु आपल्याला योग्य माहिती मिळाली नाही. दि. १.१०.१९९२ ते दि. १.१०.२००३ या काळात संचालक, क्रीडा व युवक, पुणे यांनी स्वतःच्या विभागातील कर्मचाऱ्यांना अत्युत्कृष्ट (Outstanding ) कामाबद्दल आगाऊ वेतनवाढ दिली, परंतु राज्यातील राष्ट्रीय छात्र सेनेतील कर्मचाऱ्यांना न्याय दिला नाही, याबाबतची तक्रार दूर झालेली नाही, अशी तक्रार श्री. खडकभावी यांनी दि. १२.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. श्री. खडकभावी यांना यापूर्वीच संपूर्ण माहिती देण्यात आली असल्याचा खुलासा सहाय्यक संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे श्री. सुहास एम.पाटील, यांनी आयोगाच्या विचारणेच्या अनुषंगाने दि.१८.७.२००९ रोजी केला. श्री. खडकभावी यांना देण्यात आलेल्या पत्रात पुन्हा माहिती पाठवीत असल्याचे नमूद करून त्यांनी आयोगाला प्रत सादर केली आहे.

श्री. खडकभावी यांना माहिती देण्यात आली आहे. संचालक, क्रीडा व युवक सेवा यांचा कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढी देण्याचा निर्णय योग्य की अयोग्य, कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला किंवा नाही, हे ठरविणे हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २२.७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विठ्ठल नामदेव पांगारे
मु.पो.वेळू(ग्रामपंचायत कार्यालयामागे), ता.भोर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती भोर, ता.भोर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत वेळू, ता.भोर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२५ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.६.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विठ्ठल नामदेव पांगारे
मु.पो.वेळू(ग्रामपंचायत कार्यालयामागे), ता.भोर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती भोर, ता.भोर, जि.पुणे श्री.एस.के.कुंभार

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत वेळू, ता.भोर, जि.पुणे श्री.सु.वि.काकडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.११.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>गट नं.४४३/अ व ब मध्ये ग्रामपंचायतीने केलेल्या रस्त्याच्या कामाबाबतची माहिती. | |

## विवेचन

वेळू ग्रामपंचायत, ता.भोर, जि.पुणे यांनी केलेल्या रस्त्याच्या कामाबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.विठ्ठल नामदेव पांगारे यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वेळू, ता.भोर, जि. पुणे यांच्याकडे मागितली होती. नऊ महिने उशिरा माहिती मिळाली व प्रथम अपिलाची दखल घेतली गेली नाही, म्हणून श्री.पांगारे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाच्या दि.२४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सदर अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

माहिती मुदतीत मिळाली नाही व प्रथम अपिलाची दखल घेतली गेली नाही, म्हणून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी श्री.पांगारे यांनी लेखी व तोंडी केली.

श्री.पांगारे यांनी अर्ज केला तेव्हाचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री.सुनील विनायक काकडे यांची बदली झाली आहे, तसेच मार्च २००७ मध्ये त्यांनी अर्ज केला तेव्हा गावातील तीव्र पाणीटंचाई, गाव यात्रेचे नियोजन यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. मात्र वेळोवेळी त्यांनी मागितलेली माहिती त्या त्या वेळी देण्यात आली आहे. दि.२०.३.२००७ रोजी त्यांनी केलेल्या अर्जानुसार माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.१५.५.२००७ रोजी पंचायत समिती कार्यालयाकडे अपील केले. परंतु त्यासोबत मूळ अर्जासह कोणतेही कागदपत्रे नव्हती, त्यामुळे अपिलाची दखल घेता आली नाही. त्यांच्या अपिलाची प्रत राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडून दि.२६.११.२००५ रोजी पंचायत समिती कार्यालयाला प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या

सुनावणीच्या आधीच ग्रामसेवकांनी रजिस्टर टपालाने श्री.पांगारे यांना माहिती पाठविली होती. यापूर्वी त्यांनी केलेल्या अपिलाची मुदतीत दखल घेतलेली होती असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.एस.पी.चव्हाण व अपिलीय प्राधिकारी श्री.एस.के.कुंभार यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री.सुनील विनायक काकडे यांनी माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत आठ दिवसात खुलासा सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. आपण गंभीर आजारी असल्यामुळे मुदतीत खुलासा सादर करु शकलो नाही, असे नमूद करुन श्री.काकडे यांनी दि.२९.७.२००८ रोजी खुलासा सादर केला. श्री.पांगारे यांनी मागितलेली माहिती विस्तृत (१९ मुद्दे) व किचकट स्वरुपाची होती. गावातील पाणीटंचाई व गाव यात्रेचे नियोजन यांची जबाबदारी ग्रामपंचायतीवर असल्याने मोठ्या प्रमाणावर असणारी ही माहिती तातडीने उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही, याची कल्पना श्री.पांगारे यांना दिली होती. माहिती न देण्याचा आपला उद्देश नव्हता. पूर्वी वेळोवेळी त्यांनी माहिती मागितली ती आपण दिली आहे, असे श्री.काकडे यांनी खुलाशात नमूद केले आहे. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने यांचा विचार करता त्यांचा हा खुलासा मान्य करण्यात येत आहे. मात्र अपवादात्मक बाब म्हणूनच माहिती देण्यास विलंब होणे मान्य करण्यात येत असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत विहित मुदतीतच माहिती देणे आवश्यक असल्याची समज श्री.काकडे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.६.७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९३१/ सोलापूर | श्री.गणेश भिमराव चिंतामणी मु. पो. गट नं २, माळशिरस ता.माळशिरस, जि. सोलापूर | सेक्रेटरी, श्री गणेश ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, अकलूज, ता.माळशिरस, जि. सोलापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज, ता.माळशिरस, जि. सोलापूर | कर्जदार संचालकांचे खाते उतारे, सर्व कर्जदार यादी, ताळेबंद, नफा तोटा पत्रक, २००३ -०४, ते २००६ -०७ ऑडीट रिपोर्ट इत्यादी. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँका/ पतसंस्था यांना लागू नाही,असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटीशन ५६६६ / २००७ मध्ये दिलेला आहे. |
| २ | ११८६/ सोलापूर | श्री. मनोहर भानुदास लोहार मु पो. वेळापूर, ता. माळशिरस जि. सोलापूर | व्यवस्थापक, आनंदमुर्ती ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था, वेळापूर, ता.माळशिरस. जि. सोलापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज, ता.माळशिरस, जि. सोलापूर | पतसंस्थेतील क्लार्क श्री अमजद इलादी शेख यांचे माहे नोव्हें २००३ ते मार्च २००८ या ५३ महिण्याच्या हजेरी रजिस्टर ची झेरॉक्स प्रत. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँका/ पतसंस्था यांना लागू नाही,असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटीशन ५६६६/ २००७ मध्ये दिलेला आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १२०१/ सोलापूर | श्री. निलकंठ शंकरप्पा अलिकट्टी ४६३९, शिवलिला गाजाडे प्लॉट, पंढरपूर, जि. सोलापूर | सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे - १ | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे - १ | वर्ग तीन मधील रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेची व मुलाखतीची माहिती. | माहिती मिळाल्याने समाधान झाल्याचे अपीलकर्त्याने दि. ३०.१.०९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र ९३१, ११८६ व १२०१ ) निकाली काढण्यात येत आहे.

२) अपील क्र ९३१ व ११८६ मध्ये नियंत्रक अधिकारी म्हणूण सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या सबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे, ती त्या त्या कार्यालयांनी अर्जदारांना देणे बंधनकारक आहे. त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**पुणे**
**दि. १.०७.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९४८/ सोलापूर | श्री. दत्तात्रय नामदेव सुर्वे मु.पो.जाधववाडी, पो. मोडनिंब, ता. माढा जि. सोलापूर | मुख्याध्यापक, श्री उमा विद्यालय, मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर | सचिव उमासाहेब स्मारक, संस्था, मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर | श्री. मोहन तुकाराम मोरे यांच्या नियुक्ती बाबतच्या दि. २७.८.९६ च्या ठरावाची प्रत, शालेय समिती ठरावाची प्रत, शालेय समिती ठराव क्र. १५/९६ -९७ दि.२९.१०.९६ ची प्रत, शालेय समिती ठराव क्र २७/९६-९७ दि. १७.३.९७ च्या ठरावाची प्रत, शालेय समिती ठराव क्र १३,१४ /९७ -९८ दि. २७.१०.९७ ची प्रत व इमर एकूण ७ मुद्याची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपिलकर्त्याने दि.५.५.०९ च्या पत्राने आयोगास कळविले आहे. |
| २ | १२३७/ सोलापूर | श्री. शिरीषकुमार भानुदास लोणकर मु. ता. करमाळा, किल्ला भाग, सिव्हिल कोर्टाजवळ, जि. सोलापूर | अध्यक्ष/ सचिव, विद्या विकास मंडळ, विद्यानगर, करमाळा, जि. सोलापूर | सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर | यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या खेळाच्या मैदानाला संरक्षक भिंत बांधण्यासाठी झालेल्या ठरावाची प्रत, सदर भिंत बांधण्यासाठी नगर परिषद करमाळाकडे मागितलेल्या बांधकाम परवान्याच्या अर्जाची प्रत, सदर बांधकामास सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दिलेल्या परवाण्याची प्रत व इतर एकूण ५ मुद्याची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपिलकर्त्याने आयोगास कळविले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १२३८/ सोलापूर | श्री. शिरीषकुमार भानुदास लोणकर मु. पो. करमाळा, किल्ला भाग, सिव्हिल कोर्टाजवळ, जि. सोलापूर | अध्यक्ष/सचिव, दिगंबररावजी बागल सह. मोटार वाहतुक संस्था मर्या., करमाळा, जि. सोलापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा, जि. सोलापूर | सदर संस्था कधी स्थापन झाली, संस्थेचा रजिस्टर नंबर, वाहतूक संस्थेच्या पदाधिका-यांची निवड किती वर्षाने होत, सध्या असलेल्या अध्यक्ष, सचिव, खजिनदार, व एकूण कर्मचारी यांची नावे व पत्ते, कर्मचा-यांचा पगार किती, चालू कार्यकारणी सदस्यांची निवड झाल्यानंतर किती दिवसांनी माहिती वरिष्ठ कार्यालयाला पाठविण्यात येते, वरिष्ठ कार्यालयास पाठविलेल्याची प्रत, व इमर एकूण ९ मुद्यांची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपिलकर्त्याने आयोगास कळविले आहे. |
| ४ | १२३९/ सोलापूर | श्री. शिरीषकुमार भानुदास लोणकर मु. पो. करमाळा, किल्ला भाग, सिव्हिल कोर्टाजवळ, जि. सोलापूर | प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि. सोलापूर | सह संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, कोल्हापूर विभाग, राजाराम कॉलेज परिसर, कोल्हापूर | महाविद्यालयांच्या खेळाच्या मैदाना सभोवती कुंपन घालण्यासाठी विद्यापीठ अथवा युजीसी कडून निधी दिला असल्यास पत्राची प्रत, भित बांधण्यासाठी नगरपालिका करमाळाकडे परवानगीसाठी केलेल्या अर्जाची प्रत, महाविद्यालयातील कर्मचारी श्री. विलास घुमरे श्री. कलिम काझी व प्राचार्य श्री. बिर्ले यांचे १९८६ - २००७ अखेर शासकीय हप्ते वजा जाता मिळणारे वेतन इत्यादी माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपिलकर्त्याने आयोगास कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक क्र १ ते ४ ( अपील क्र ९४८, १२३७, १२३८ व १२३९/ सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. ६.०७.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

डॉ.श्रीपाद कृष्ण इनामदार
डॉ.इनामदार एक्सरे क्लिनिक, अक्षय सोसायटी,
विशाल थिएटरसमोर, पिंपरी, पुणे-१८ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती करमाळा, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
मु.पो.कुगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५७+१२९९ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२००८ व १७.७.२००८ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** डॉ.श्रीपाद कृष्ण इनामदार
डॉ.इनामदार एक्सरे क्लिनिक, अक्षय सोसायटी,
विशाल थिएटरसमोर, पिंपरी, पुणे-१८

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती करमाळा, जि.सोलापूर श्री.एम.के.गाडगे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
मु.पो.कुगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.एस.डी.तांबोळी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.४.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे कुगाव येथील गट क्र.१० या शेतजमिनीचा बिगरशेती वापर, घरांची बांधकामे व घरपट्टी. तसेच किती जणांनी बिगरशेती वापर करुन घरांची बांधकामे केली आहेत. त्यासाठी लेखी परवानगी घेतली आहे का, नावाची यादी व अर्जाच्या छायांकित प्रती. अनधिकृत बांधकामाबाबत विलंबशुल्क, दंडात्मक कारवाई केली असल्यास पावत्या व ठरावाची नक्कल. घरांची प्रतवारी व त्यावर आकारली जाणारी घरपट्टी याचे कोष्टक, गावातील शेतात किती जणांनी मंदीर बांधले, त्याची नोंद केली आहे काय, त्याच्या घरपट्टीचा दर. | |

## विवेचन

मौजे कुगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर येथील शेतजमिनीचा बिगरशेती वापर, तेथील घरांची विनापरवाना बांधकामे इ. संबंधातील सन १९८० ते २००७ या कालावधीतील माहिती अपीलकर्ता डॉ.श्रीपाद कृष्ण इनामदार यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक कुगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर यांच्याकडे मागितली होती. डॉ.इनामदार यांच्या मालकीच्या गट क्र.१० या शेतजमिनीच्या व त्यावरील राहत्या घराच्या संबंधातील विषयाच्या अनुषंगाने डॉ.इनामदार यांनी ही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी डॉ.इनामदार यांच्या अर्जातील नऊपैकी मुद्दा क्र.आठची माहिती दिली व इतर मुद्दयांबाबत आपल्या कार्यालयाकडून नोंदी केल्या जात नसल्याने माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले. आपल्याला दिलेली माहिती अपुरी व अयोग्य असल्याच्या कारणावरुन डॉ.इनामदार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर यांच्याकडे अपील केले. परंतु 'श्री.ए.बी.सरडे, माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक कुगाव यांनी अर्जदार यांना परिपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे, अभिलेख अद्ययावत करुन परिपूर्ण माहिती बिनाविलंब द्यावी,' असा आदेश अपिलीय प्राधिकारी

तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती करमाळा यांनी दिला. त्यानंतरही माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन डॉ.इनामदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२७.६.२००८ व दि.१७.७.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. तीनही घटकात एकमत न झाल्यामुळे सदरच्या अपिलाची आयोगासमोर सुनावणी घेण्यात आली.

डॉ.इनामदार यांनी दि.२८.११.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात पुढील बाबी नमूद केल्या आहेत :

(अ) दि.२२.२.२००७ रोजी ग्रामसेवक कुगाव, ता.करमाळा यांच्याकडून घरपट्टी भरली नसल्याबद्दल नोटीस मिळाली.

(ब) ग्रामसेवक कुगाव यांच्या सूचनेनुसार दि.२०.३.२०७ रोजी पत्राद्वारे शेतजमिनीचा बिगरशेती वापर करण्यास ग्रामपंचायतीची आवश्यक परवानगी मागणारा अर्ज केला. याच पत्रात क्षेत्र, प्रकार, मूल्यांकन इ.तपशील देऊन घराची ग्रामपंचायत दप्तरी नोंद करण्याबद्दल अर्ज केला. तसेच घरपट्टीची आकारणी निश्चित करुन मिळावी असे कळवून भरण्यास झालेल्या विलंबासंबंधी दंड/विलंबशुल्कही कळविण्यास सांगितले. पत्राच्या अखेरीस ग्रामपंचायत कळवेल ती सर्व घरपट्टी, थकबाकी व विलंबशुल्कासह एकरकमी त्वरित भरण्याची तयारी दर्शविली.

(क) दि.२७.३.२००७ रोजी मी ग्रामसेवक कुगाव यांच्याकडे माहिती अधिकारांतर्गत माहितीची मागणी केली. या अर्जाद्वारे मी मौजे कुगाव येथे किती व्यक्तींनी शेतजमिनीचा बिगरशेती वापर करुन घरे बांधली त्यांची नावे, त्यातील कोणी-कोणी घरबांधणीपूर्वी ग्रामपंचायतीची पूर्वपरवानगी घेतली, सदर परवानगी देण्याविषयीचे ग्रामपंचायतीचे ठरावांच्या प्रती, अशा पूर्ण परवानगीशिवाय बांधलेल्या घरांना नंतर परवानगी देण्यात आली अशी काही प्रकरणे असतील तर त्यांची नावे, नंतर नोंद झाल्यामुळे दंडात्मक कारवाई झाली असल्यास त्याबद्दलच्या ग्रामपंचायतीच्या ठरावांच्या प्रती, वर्ष २००२ ते २००६ मध्ये भरलेल्या अशा सर्व घरपट्टीच्या पावत्यांच्या प्रती, ज्यांनी विनापरवानगी व विनानोंदणी घरे बांधली अशा व्यक्तींना ग्रामपंचायतीने पाठविलेल्या नोटिशींच्या प्रती इत्यादी

माहिती मागितली. या अर्जाला उत्तरादाखल दिलेल्या माहितीमध्ये अनेक त्रुटी असून माहिती अत्यंत संदिग्ध स्वरुपाची दिली गेली आहे. मौजे कुगाव येथे किमान २० ते २२ घरे शेतजमिनीवर बांधलेली असून त्यापैकी किती घरे ग्रामपंचायतीच्या पूर्वपरवानगीने बांधली आहेत, किती लोक रीतसर घरपट्टी नियमित भरत आहेत याची मला माहिती हवी आहे. 'ग्रामपंचायतीकडे नोंदी ठेवल्या जात नाहीत' हे उत्तर योग्य नाही. अशा नोंदी ठेवणे ही ग्रामसेवकाची व ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे, असे डॉ.इनामदार यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

आपण दि.४.१२.२००७ रोजी ग्रामपंचायत कुगाव मधील कामाचा पदभार स्वीकारला असून त्वरित माहिती दिली आहे, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक कुगाव श्री.एस.डी.तांबोळी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. श्री.तांबोळी यांनी आपल्याला त्वरित माहिती दिली, मात्र आधीचे ग्रामसेवक श्री.अंगद सरडे यांनी माहिती पूर्ण व विहित मुदतीत दिली नाही. दहा महिन्यांच्या कालावधीत व अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश दिल्यानंतरही माहितीची पूर्तता त्यांनी केली नाही. त्यामुळे त्यांना शास्ती व्हावी, असे प्रतिपादन डॉ.इनामदार यांनी प्रपत्रात केले असून त्याचाच पुनरुच्चार त्यांनी आयोगापुढील सुनावणीत केला.

या संदर्भात तत्कालीन ग्रामसेवक श्री.सरडे यांचा खुलासा सादर करण्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार श्री.सरडे यांनी दि.२८.९.२००८ रोजी या विषयातील सविस्तर खुलासा सादर केला आहे. रस्ता सफाईचे काम करीत असताना व रस्त्यालगतची झुडपे तोडत असताना डॉ.इनामदार यांच्या शेताच्या कुंपणाचे १० ते १२ खांब पडले. त्यावरुन डॉ.इनामदार यांनी आपल्याविरुध्द सातत्याने तक्रारी केल्या. तसेच माहितीच्या अधिकारात विविध अर्ज केले. त्यावर त्यांना सर्व माहिती दिली. ग्रामपंचायतीकडे न ठेवलेल्या नोंदीबाबतचा स्पष्ट उल्लेख त्यात केला आहे. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी यांच्या दि.५.५.२००७ च्या आदेशानंतर शेतातील मंदिरांची पाहणी करुन त्याबाबतची माहिती, तसेच बिगरशेती वापर करुन शेतामध्ये घराचे बांधकाम करण्यास परवानगी न घेणाऱ्यांना या आदेशानंतर नोटिसा

पाठविल्या असून त्याच्या प्रतीही डॉ.इनामदार यांना दिल्या आहेत, असे श्री.सरडे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

'डॉ.इनामदार यांच्या शेताचे कुंपण दुरुस्त करुन देण्यासाठी आपण गेल्यानंतर दुरुस्तीऐवजी दहा हजार रुपये नुकसानभरपाई देण्याची मागणी डॉ.इनामदार यांनी केली. त्याबाबत ते आग्रही होते. आपल्याला आर्थिक व मानसिक त्रास देण्यासाठी त्यांनी माहितीच्या अधिकाराचा वापर केला आहे. शेवटी आपण दि.२९.११.२००७ रोजी त्यांना १०,०००/- रुपये दिले,' असे नमूद करुन श्री.सरडे यांनी सदर रक्कम स्वीकारल्याची डॉ.इनामदार व पंच यांच्या स्वाक्षरीसह असलेल्या पावतीची प्रत सोबत सादर केली आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकाऱ्यांनी काही माहिती प्रारंभी दिली. शेतातील मंदिरांची व परवानगी न घेता बांधलेल्या घरांची पाहणी करुन नोटिसा आदी कारवाई करणे हा प्रशासकीय कारवाईचा विषय आहे. अशा प्रकारची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही, मात्र ग्रामपंचायतीचे अभिलेख अद्ययावत ठेवणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी असून गटविकास अधिकाऱ्यांनी माहिती मागणीचे अर्ज व अपिले यानंतर तसे आदेश देण्यापेक्षा नियमितपणे त्याबाबतची दक्षता घेतली पाहिजे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता शास्तीची अपीलकर्त्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

डॉ.इनामदार यांनी नुकसानभरपाई मागणे व घेणे हा माहितीच्या अधिकारातील विषय नाही व अशा प्रकारच्या कामांसाठी माहितीच्या अधिकाराचा वापर अपेक्षित व योग्य नाही, याची जाणीव सर्व संबंधितांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२४.७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपीलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश काढण्यात येत आहेत :-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९८२ / सांगली | श्री.लक्ष्मण बाबूराव मडीयाळ मु.खटाव,ता.पलूस, जि.सांगली | सचिव, गणपती पाणीपुरवठा सहकारी संस्था, मर्या. खटाव, पलूस | सहा.निबंधक, जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था कार्यालय, कुबेरा चेंबर्स सांगली | श्री गणपती पाणी पुरवठा सहकारी संस्था, खटाव यांचा जमाखर्च सभेचा ठराव, कामगारांचे पत्रक नोटीस, पाणी पाळी रजिस्टर इ.बाबतची माहिती | श्री गणपती पाणी पुरवठा सहकारी संस्थेस केंद्र अगर राज्य शासनाचे कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष अर्थसहाय्य प्राप्त नसल्याचे, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पलूस यांनी प्रमाणित केले आहे. त्यामुळे सदर संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही. |
| २ | ३५३/ २००९ सांगली | श्री.फरहाद शब्बीर आलासे नदीवेस, कोळी गल्ली, शास्त्री चौक, मिरज, ता.मिरज, जि.सांगली | उपविभागीय पोलीस अधिकारी, मिरज विभाग, मिरज | पोलीस अधीक्षक, सांगली | मोटर सायकल क्र.एमएच ०८ जे ६५०२ च्या अपघातासंदर्भात एकूण ३ मुद्दयांची माहिती | जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.३.०९ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास दिलेले उत्तर योग्य आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते २ (अपील क्र.९८२/सांगली , ३५१/२००९ /सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ३५१/२००९ सांगली या अपिलामधील जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, मिरज विभाग, मिरज यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर न दिल्याने त्यांना या संदर्भात सक्त ताकिद देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०२-०७-२००९.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विकास भिमराव गायकवाड
मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९९९ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विकास भिमराव गायकवाड
मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.बी.एम.वासुदेव

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.आर.एम.साळुंके

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.७.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००५ ते २००७ मे अखेर आपल्या विभागाकडे आलेले माहिती अर्ज, या अर्जांवर आपण दिलेली माहिती, केव्हा, कोणाकडे दिली, कोणती माहिती दिली, तक्रारी अर्जावर कोणती कारवाई केली, तक्रारी अर्जांच्या छायांकित प्रती, अपील अर्जांच्या छायांकित प्रती व त्यावर घेतलेल्या निर्णयाची तारीख व कोणता निर्णय घेतला याबाबत माहिती व माझ्या अपील अर्जावर निर्णय न घेण्याची कारणे व श्री.बापू पोळ यांच्या तक्रारी अर्जावर करण्यात आलेल्या कारवाईच्या व तक्रारी अर्जाच्या छायांकित प्रती. | |

## विवेचन

माहिती अधिकाराच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती विलंबाने व अपूर्ण दिली, या कारणावरुन अपीलकर्ता श्री.विकास भिमराव गायकवाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दिनांक २७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. यामध्ये तीनही घटकात एकमत न झाल्यामुळे त्याच वेळी सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी श्री.आर.एम.साळुंके यांनी माहिती दिली नाही, म्हणून आपण प्रथम अपील केले. आपली दोन अपिले असताना माहिती दिल्याची चुकीची पोहोच श्री.साळुंके यांनी सादर केली व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती इंदापूर यांनी आदेश देऊनही आपल्याला पूर्ण माहिती दिली नाही, असे प्रतिपादन श्री.गायकवाड यांनी केले. सन २००५ ते मे २००७ अखेर आलेल्या माहिती अर्जांच्या संदर्भातील कार्यवाही व दिलेल्या माहितीच्या प्रती असा विस्तृत तपशील श्री.गायकवाड यांनी मागितला होता. आलेल्या अर्जांवर माहिती अधिकारा

अंतर्गत काय कार्यवाही केली व कोणती माहिती कोणाला दिली, हे माहिती अधिकारांतर्गत देण्याबाबत संभ्रम होता. त्यामुळे विलंब झाला. मात्र ४७३ पृष्ठांची माहिती प्रथम अपिलाच्या निर्णयापूर्वीच नि:शुल्क पुरविलेली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.आर.एम.साळुंके यांनी सांगितले. श्री.बापू पांडुरंग पोळ यांनी ग्रामपंचायतीची चौकशी करण्याबाबत दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती दिली नसल्याचे श्री.गायकवाड यांनी नमूद केले. श्री.पोळ यांनी अर्ज दिल्यानंतर दोनच दिवसांनी श्री.गायकवाड यांनी माहिती मागणारा अर्ज केला. त्यावरील कार्यवाही व चौकशी पूर्ण झालेली नसताना त्यावरील माहिती देणे शक्य नव्हते. आता चौकशी पूर्ण झालेली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.आर.एम.साळुंके व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती हवेली श्री.पी.एस.काळे यांनी नमूद केले. याबाबतच्या चौकशीच्या अहवालाची प्रत श्री.गायकवाड यांना त्वरित देण्याचा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार समक्ष माहिती देऊ केली असता श्री.गायकवाड यांनी ती घेण्यास नकार दिल्यामुळे दि.३०.६.२००८ रोजी रजिस्टर टपालाने त्यांना ती पाठविण्यात आली, असे श्री.साळुंके यांनी दि.१.७.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.१७.७.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ